**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक २८ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **भारतीय नेमबाज मनू भाकर बनली पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी पहिली खेळाडू- 221.7 गुण मिळवत कांस्यपदकावर कोरलं नाव.**
2. **आज प्रसारित मन कि बात मधून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील स्थानिक गोंड आणि माना जमातीच्या बांधवांसाठी पंतप्रधानांकडून गौरवोद्गार, विदर्भातील ब्लॉक प्रिंट साड्यांचाही केला उल्लेख.**
3. **अपघात प्रवण स्थळांची सुधारणा करण्यासाठी यंत्रणांनी परस्पर समन्वयाने रस्त्यांच्या सुरक्षेसाठी लोकसहभाग सुनिश्चित करावा: केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं नागपूर जिल्हा सुरक्षा समिती बैठकीत आवाहन.**
4. **संततधार पावसामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत- गडचिरोली जिल्हयातील ४० मार्गांवरील वाहतूक ठप्प.**

****

ऑलिम्पिक

भारताची नेमबाज मनू भाकर हिने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी पहिली नेमबाज बनून इतिहास रचला आहे. महिलांच्या 10 मीटर एअर पिस्तूल अंतिम स्पर्धेत, तिने

कांस्यपदक जिंकण्यासाठी 221.7 गुण मिळवले. भाकरने कोरियन नेमबाज, किम येजी आणि ओह ये जिन यांच्याविरुद्ध उत्तम कौशल्य आणि संयम दाखवत उत्कृष्ट खेळाचं प्रदर्शन केलं. भाकरचा विजय हा आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय नेमबाजीसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. मनू भाकरचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केलं आहे. दरम्यान, पॅरिस ओलम्पिकमध्ये आज, तिरंदाजी, टेबल टेनिस, जलतरण, नेमबाजी, टेनिस, मुष्टियुद्ध, बॅडमिंटन, रोविंग इत्यादी प्रकारांमध्ये भारताचे क्रीडापटू मैदानात उतरले.भारताच्या बॅडमिंटनपटूंनी उत्तम सुरुवात केली. दुहेरीत चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रांकीरेड्डी यांनी, तर एकेरीत लक्ष्य सेन यानं पुढची फेरी गाठली. पी.व्ही.सिंधू हिनं सलामीच्या लढतीत आपल्या प्रतिस्पर्ध्यावर २१-९, २१-६ अशी सहज मात केली. तर महिलांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये भारताच्या रमिता जिंदालनं अंतिम फेरी गाठली. तिनं ६३१ पूर्णांक ५ दशांश गुणांची कमाई करून पाचवं स्थान मिळवलं. रोविंगच्या स्कल्स प्रकारात पुरुष एकेरीत बलराज पन्वर यानं चौथं स्थान मिळवून पुढच्या फेरीतलं स्थान नक्की केलं तर महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत ५४ किलो वजनी गटात प्रीती पवार हिनं पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे. मात्र टेबल टेनिसमध्ये शरथ कमलला स्लोव्हेनियाच्या डेनी कोझुलकडून 2-4 असा पराभव पत्करावा लागला. सहाव्या गेममध्ये शरथ 6 गुणांनी आघाडीवर होता,

परंतु स्लोव्हेनियनने टाई ब्रेकमध्ये परतण्यासाठी संघर्ष करत विजय मिळवला.

मन कि बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज  मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. मन  की बात च्या ११२ व्या भागातून, त्यांनी देशाच्या विविध भागांतील हातमाग आणि दर्जेदार वस्त्र निर्मितीचा उल्लेख केला. त्यात, विशेषतः महाराष्ट्रातील पैठणी, खादी आणि विदर्भातील ब्लॉक प्रिंट साड्यांचा उल्लेख केला. ७ ऑगस्टला राष्ट्रीय हातमाग दिन असून, प्रत्येकाने हातमागाच्या कपड्यांचा प्रसार करावा, असं आवाहन त्यांनी केलं. युवा वर्गाला अमली पदार्थांच्या विळख्यातून सोडविण्यासाठी 'मानस' या हेल्प लाईनची सुरुवात केल्याचं त्यांनी नमूद केलं. याअंतर्गत समुपदेशन आणि पुनर्वसनाबद्दलच्या माहितीसाठी १-९-३-३ हा टोल फ्री मदत क्रमांकही सुरू केला असल्याची  माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली.

उद्या २९ जुलै रोजी साजरा होणाऱ्या व्याघ्र दिनाविषयी बोलताना त्यांनी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा आवर्जून उल्लेख केला. जगातील ७० टक्के वाघ भारतात असल्याचं सांगून, स्थानिक गोंड आणि माना जमातीच्या बांधवांचा विशेष उल्लेख करीत, त्यांनी इको टुरिझम सोबत जुळवून घेतलं असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधानांनी PARI म्हणजे पब्लिक आर्ट ऑफ इंडिया बद्दल आजच्या मन कि बात मधून माहिती दिली.सार्वजनिक कला लोकप्रिय करण्यासाठी उदयोन्मुख कलाकारांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी, प्रकल्प PARI हे एक प्रमुख माध्यम बनत आहे. रस्त्याच्या कडेला, भिंतींवर आणि भुयारी मार्गांमध्ये जी सुंदर चित्रे दिसतात त्या कलाकृती PARI शी संबंधित कलाकारांनी बनवल्या असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

त्याचप्रमाणे 'एक पेड मा के नाम' अभियानात सहभागी होऊन, वृक्षारोपण करून त्यासोबत सेल्फी काढून पाठविण्याच आवाहन पंतप्रधानांनी नागरिकांना केलं.

‘हर घर तिरंगा’ अभियानाअंतर्गत देशाच्या स्वातंत्र्यदिनी सेल्फी काढून नमो अप वर पाठविण्याचे आवाहन देखील त्यांनी आज 'मन कि बात' मधून केलं. सोबतच सध्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा सुरू आहे, ही स्पर्धा म्हणजे खेळाडूंना जागतिक पातळीवर तिरंगा फडकवण्याची संधी आहे असं म्हणत, या स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय खेळाडूंना देशवासीयांनी पाठिंबा द्यावा असं आवाहनही त्यांनी केलं.

## राज्यपालांच्या नियुक्त्या

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विविध राज्यांमध्ये नवीन राज्यपालांची नियुक्ती केली आहे. सध्याचे झारखंडचे राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती

केली आहे. तर, विधानसभेचे माजी अध्यक्ष हरी भाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती केली आहे. तेलंगणात, त्रिपुराचे माजी उपमुख्यमंत्री जिष्णू देव वर्मा यांची, सिक्कीममधे माजी राज्यसभा खासदार ओमप्रकाश माथुर, झारखंडमधे माजी केंद्रीय मंत्री संतोष कुमार गंगवार, छत्तीसगडमधे माजी खासदार रामेन डेका, तर मेघालयात कर्नाटकचे माजी मंत्री सी एच विजय शंकर यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती केली आहे.

## विधान परिषद शपथविधी

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निर्वाचित ११ सदस्यांचा शपथविधी आज विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात पार पडला. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. नवनिर्वाचित सदस्य पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, भावना गवळी, कृपाल तुमाने, योगेश टिळेकर, प्रज्ञा सातव, शिवाजीराव गर्जे, अमित गोरखे, मिलिंद नार्वेकर, राजेश विटेकर या सदस्यांनी शपथ घेतली. विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती. दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा २८ ते ३० जुलै दरम्यान नियोजित महाराष्ट्र दौरा काही कारणास्तव पुढं ढकलण्यात आला आहे.

रस्ते सुरक्षा-नितीन गडकरी

नागपुरातील जिल्हाप्रशासन, वाहतूक यंत्रणा तसेच सर्व रस्ते बांधणी संस्थांनी रस्ते अपघात प्रतिबंधाविषयी समन्वय साधून सेव लाईफ फाउंडेशनसारख्या स्वयंसेवी संस्थांनी अपघात प्रवण स्थळांची सुधारणा करण्यासाठी सुचवलेल्या उपाययोजना राबविल्या पाहिजे. स्वयंसेवी संस्थांसोबत प्रशासनाने काम करून रस्ते सुरक्षा क्षेत्रात लोकसहभाग वाढवण्याचं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. ते आज नागपूर इथं झीरो फॅटलिटी डिस्ट्रिक्ट रिव्यू आणि जिल्हा रस्ते सुरक्षा समिती बैठकीत मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी रस्ते सुरक्षा क्षेत्रात कार्य करणाऱ्या 'सेव लाईफ' या स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष पियुष तिवारी यांनी नागपूर ग्रामीण आणि शहरात घडलेल्या रस्ते अपघातांची तसेच त्यावर संबंधित यंत्रणेला सुचवलेल्या उपाययोजनांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. नागपूर ग्रामीणमध्ये मागील वर्षी 440 जणांना तर नागपूर शहरामध्ये 308 जणांना आपला प्राण रस्ते अपघातात गमवावे लागल्याची माहिती त्यांनी दिली. अपघात स्थळी त्वरित मदत कार्याबद्दल अधिक माहिती देताना नितीन गडकरी म्हणाले....

नीती आयोग-मुख्यमंत्री

कोकणात जाणारे पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्याकडे वळविणे, नदीजोड प्रकल्पाला वेग देणे या महत्वाच्या विषयांसह दुध, कापूस, सोयाबीन, कांदा यासंदर्भात शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून त्यांना न्याय मिळावा अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल निती आयोगाच्या बैठकीत बोलतांना केली. राष्ट्रपती भवन येथे अशोक मंडपात नीति आयोगाच्या नवव्या नियामक परिषदेत ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद पार पडली.

हवामान

विदर्भात अनेक ठिकाणी कालपासून मुसळधार पाऊस पडत आहे. **नागपुरात** सुद्धा मागील २४ तासांपासून संततधार पाऊस पडत आहे. आज नागपूर, वर्धा, अमरावती आणि अकोला इथं मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. **वर्धा** जिल्हयात आज मुसळधार पाऊस झाला ज्यात समुद्रपूर-लाहोरी रस्त्यावरील वाघाडी नाल्याला आलेल्या पुरामध्ये एक ट्रक वाहून गेला. जिल्हास्तरीय बचाव पथकाला पाचरण करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिली आहे. उद्या केवळ अमरावतीत पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात  आज सकाळपासून दिवसभर पाऊस सुरुच असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. पुरामुळे गडचिरोली-चामोर्शी आणि आलापल्ली-भामरागड या मार्गांसह जिल्ह्यातील ४० मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. मागील चोवीस तासांत धानोरा तालुक्यात सर्वाधिक १५४.२ मिलिमीटर पाऊस पडला. त्याखालोखाल गडचिरोली तालुक्यात १२०.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. जिल्ह्यात १ जूनपासून आजपर्यंत सरासरी १६२.९ टक्के पाऊस पडला आहे.हि टक्केवारी  अपेक्षित पर्जन्यमानापेक्षा ३७६ मिलिमीटरने अधिक आहे. काल हेमलकसा-भामरागडदरम्यानच्या पुरात अडकलेले ३५ नागरिक आणि ३ मुलांना एसडीआरएफ आणि महसूल विभागाच्या पथकाने सुरक्षितरित्या बाहेर काढले. शिवाय गडचिरोली तालुक्यातील रानमूल येथे पुराने वेढलेल्या २ व्यक्तींचेही प्राण वाचविण्यात आले. दरम्यान, काल गोसेखुर्द धरणातून ४७ लाख क्यूमेक्स पाण्याचा विसर्ग होत होता. आज तो अडीच लाख क्यूमेक्स करण्यात आला असून, पुन्हा वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे गडचिरोली-नागपूर मार्ग पुन्हा बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे तर,

**भंडारा** जिल्ह्यात  रात्रीपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली असल्याने  लाखनी तालुक्यातील  किन्ही येथे  पावसामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरून  जनजीवन विस्कळीत झाले आहे.

## महिला/पुरुष क्रिकेट

महिला क्रिकेटमध्ये आशिया चषक टी ट्वेंटी स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि यजमान श्रीलंका यांच्यात होत आहे. भारतीय संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ६ गडी गमावत १६५ धावा केल्या. यात स्मृती मंधानाच्या ६० धावांचा समावेश आहे. सध्या श्रीलंका दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करत खेळत असून शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा 17 षटकांत 2गडी गमावुन 141 धावा केल्या आहेत. दरम्यान, पुरुष क्रिकेटमध्ये तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी मालिकेतला दुसरा सामना आज संध्याकाळी सात वाजता पल्लेकल आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणार आहे.

******